RNI No. MAHBIL/2009/37831

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष ६, अंक १३२(२)] गुरूवार, डिसेंबर २४, २०२०/पौष ३, शके १९४२ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ३२२

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

गृहविभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक २४ डिसेंबर, २०२०

अधिसुचना

महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९.

क्रमांक बीपीए११२०/प्र.क्र.१९३/राउशु-२.—महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा पंचवीस) कलम १३९ च्या पोट कलम *(१)* च्या खंड *(ड१)* अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे खालील आदेश देत आहे:-

(अ) वर्ष २०२०-२१ करिता, नमुना एफ़एल-३, एफ़एल-४,नमुना ई आणि नमुना ई २ वगळून, सर्व अनुज्ञप्त्या आयुक्त,राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य यांच्या अधिसुचना क्र.बीपीए १११९/२०१९-२०/VII दिनांक ३१ जानेवारी २०१९ नुसार विहीत अनुज्ञप्ती शुल्क भरतील.

(ब) (i) वर्ष २०२०-२१ करिता, नमुना एफ़एल-३ व नमुना एफ़एल-४ मधील सर्व अनुज्ञप्त्या आयुक्त,राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य यांच्या अधिसुचना क्र.बीपीए १११९/२०१९-२०/VII दिनांक ३१ जानेवारी २०१९ मध्ये विहीत अनुज्ञप्ती शुल्काच्या ५० ट्क्के अनुज्ञप्ती शुल्क भरतील.

(ii) वर्ष २०२०-२१ करिता, नमुना ई व नमुना ई-२ मधील सर्व अनुज्ञप्त्या आयुक्त,राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य यांच्या अधिसुचना क्र.बीपीए १११९/२०१९-२०/VII दिनांक ३१ जानेवारी २०१९ मध्ये विहीत अनुज्ञप्ती शुल्काच्या ७० ट्क्के अनुज्ञप्ती शुल्क भरतील.

(क) आयुक्त,राज्य उत्पादन शुल्क,महाराष्ट्र राज्य यांच्या अधिसुचना क्र.बीपीए १११९/२०२०-२१/VII दिनांक ३० जानेवारी २०२० नुसार भरणा केलेले अनुज्ञप्ती शुल्क जर या आदेशात विहीत अनुज्ञप्ती शुल्कापेक्षा अतिरिक्त आढळल्यास, पुढील अनुज्ञप्ती नुतनीकरणाच्या वेळेस अनुज्ञप्ती शुल्कात समायोजित करण्यात येईल. या आदेशाच्या अनुषंगाने अतिरिक्त ठरणा-या अनुज्ञप्ती शुल्काचा परतावा केला जाणार नाही.

(ड) ज्या अनुज्ञप्त्यांनी अद्याप वर्ष २०२०-२१ करिता नुतनीकरण केलेले नाही व अनुज्ञप्ती शुल्काचा भरणा केलेला नाही, त्यांनी या आदेशानुसार दिनांक ३१ डिसेंबर २०२० रोजी किंवा तत्पुर्वी अनुज्ञप्ती शुल्काचा भरणा करणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वल्सा नायर-सिंह,
शासनाच्या प्रधान सचिव.

HOME DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032 Dated the 24 December 2020

NOTIFICATION

MAHARASHTRA PROHIBITION ACT, 1949.

No BPA 1120/CR 193/EXC-2 –In exercise of the powers conferred by clause (d1) of sub-section (1) of section 139 of the Maharashtra Prohibition Act (Bom.XXV of 1949), and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra orders as follows :-

(a) All Licences, except Form FL-III, FL-IV, Form E and Form E-2, shall, for the year 2020-21, pay the Licence fee as prescribed under Notification No. BPA.1119/2019-20/VII dated 31st January 2019 by Commissioner, State Excise, Maharashtra State.

(b) (i) All Licences in Form FL-III and FL-IV shall, for the year 2020-21, pay 50% of the Licence fee as prescribed under Notification No. BPA.1119/2019-20/VII dated 31st January 2019 by Commissioner, State Excise, Maharashtra State.

(ii) All Licences in Form E and E-2 shall, for the year 2020-21, pay 70% of the Licence fee as prescribed under Notification No. BPA.1119/2019-20/VII dated 31st January 2019 by Commissioner, State Excise, Maharashtra State.

(c) All Licence fees paid as per Notification No. BPA.1119/2020-21/VII dated 30th January 2020 by Commissioner, State Excise, Maharashtra State, if found in excess to the Licence fee as prescribed in this order, shall be adjusted at the time of payment of Licence fee at the next renewal of License. No refund shall be payable on account of excess Licence fee in view of this order.

(d) All Licences that have not yet renewed and paid Licence fee for the year 2020-21, shall pay the Licence fee as per this order on or before 31st December 2020.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VALSA NAIR- SINGH,
Principal Secretary to Government

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.